[illegible]

[illegible]

## प्रकरण तिसरे

# ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेची अभिव्यक्ती

१) प्रास्ताविक

२) ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेची भाषा

३) ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतील प्रतिमासृष्टीचे स्वरूप

४) ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतील मुक्तछंदाचे स्वरूप

५) ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेत झालेला अलंकाराचा वापर

६) हिंदी – इंग्रजी शब्दांचा वापर

७) ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतून अभिव्यक्त झालेला समाज

८) मानवी जीवनाच्या विविध स्तरांचे व घटकांचे चित्रण

९) ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतील वास्तव

१०) ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतून अभिव्यक्त झालेले बदल परिवर्तनाचे चित्र

११) ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतील सजगता – जागृतीचे भान

१२) ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेचे अभिव्यक्ती विशेष

---

## प्रकरण तिसरे

# ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेची अभिव्यक्ती

मागील प्रकरणात आपण ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेचे स्वरूप पाहिले. त्यांच्या कवितेतील सामाजिक जाणिवा, जीवनविषयक जाणिवा व काव्यविषयक जाणिवा व त्या जाणिवा प्रकट करणाऱ्या कवितांची आशयसूत्रे निश्चित करून त्यांचे विविध गटात वर्गीकरण केले. सदर प्रकरणात त्यांच्या कवितेच्या अभिव्यक्तीचे विशेष पहावयाचे आहेत. ते पुढीलप्रमाणे पाहता येतील.

## १) प्रास्ताविक :

गद्यरचनेपेक्षा कवितेची भाषा ही वेगळी व वैशिष्ट्यपूर्ण असते. त्यातून कवीच्या भावभावना, अनुभव, व्यक्तिमत्त्व साकार होते. भाषा ही मानवी जीवनाचे अविभाज्य अंग आहे. कारण मानवाच्या सर्व कृती भाषेतूनच सिद्ध होतात. माणूस नेहमीच्या व्यवहारातही भाषेतूनच बोलतो, मात्र कवितेतील भाषाव्यवहार पूर्णत: भिन्न असतो. भाषेचे नैसर्गिक गुणधर्म सांगत असताना सुधीर रसाळ लिहितात,

''थोडक्यात आपणास असे म्हणता येईल की, लवचिकपणा परिवर्तनशीलता, रूपकात्मता हे भाषेचे नैसर्गिक गुणधर्म आहेत. हे गुणधर्म ती ज्या समाजाचे साधन आहे त्या समाजाच्या परिवर्तनशीलतेतूनच जन्माला आले आहेत. म्हणूनच भाषा हे कला माध्यम होऊ शकले आहे. कवी या माध्यमात जी संघटना बांधतो ती वस्तुनिष्ठ असूनही समाजाबरोबर काळाबरोबर बदलत राहते आणि या प्रत्येक परिवर्तनात ती आपले वस्तुनिष्ठत्व टिकवून ठेवते. तिला लाभलेले हे वैशिष्ट्य भाषेच्या अंगभूत गुणधर्मामुळेच लाभते आहे.''[१]

काव्यातील भाषा लवचिक असते, परिवर्तनशील व रूपकात्मक असते त्यातून एकाचवेळी अर्थाच्या अनेक छटा व्यक्त होतात. पद्याला लयबद्धता असते. नाद,

लय, छंद, वृत्त, अलंकार यांना कवितेत महत्त्वाचे स्थान लाभलेले असते. कवितेतील भाषा रसिकांच्या संवेदनांना आवाहन करते. व आशयाला अधिक अर्थपूर्ण बनवते. काव्यभाषेमध्ये सर्जकता असते व शब्दांचा एक विशिष्ट क्रम असल्याने तिच्यात एक प्रकारचे सौंदर्य निर्माण होते. याविषयी गंगाधर पाटील यांचे मत महत्त्वपूर्ण आहे.

''कविता म्हणजे प्रतिमास्पर्शी शब्दार्थमयी भाषिक रचना या भाषिक रचनेत शब्द, शब्दबंध व वाक्यबंध हे विशिष्ट क्रमाने नादलयीत संघटित होऊन कवींचा प्रतिभास्पर्शी अभिप्राय साकार करीत असतात.''[२]

अशा प्रकारे कवितेची भाषा ही व्यवहार भाषेपेक्षा, गद्यातील भाषेपेक्षा वेगळी असते. ती स्वायत्त असते व या भाषेचा वापर वैशिष्ट्यपूर्ण असतो. या संदर्भाने आता ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतील भाषेचा विचार करू.

## २) ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेची भाषा :

ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतील भाषा ही वैशिष्ट्यपूर्ण व रसपरिपोष करणारी आहे. जीवनातील वास्तव अनुभव शब्दांकित करताना त्यांच्या कवितेतील भाषा प्रतिकात्मक रूप धारण करते. त्यांच्या भाषेची महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### ग्रामीणतेचे रंग लाभलेली भाषा :

कवी ज्या ग्रामीण भागात वाढले ज्या ग्रामीण परिसरात ते राहतात तेथील लोकांची सुख-दु:खे मांडताना त्यांनी त्यांचीच भाषा अतिशय चपलखपणे वापरलेली दिसते. विविध जाती जमातीच्या लोकांचे दु:ख व्यक्त करताना समाजातील विविध स्तरांचे चित्रण करताना त्यांच्याच नित्यव्यवहारातील भाषा वापरल्याने कोळींची कविता अधिक जिवंत बनते हे त्यांच्या कवितेचे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. त्यांच्या काही कवितांचा संदर्भ देऊन ही गोष्ट स्पष्ट करता येईल.

ग्रामीण भागातील अशिक्षित, उपेक्षित, स्त्रीच्या भावभावना व्यक्त करणारी कोळींची 'डिचकी' ही कविता पाहू.

"कोपऱ्यातली बारकी डिचकी घी
म्हसुबाच्या बागंत जा ! आन्
जरा आमटी आन् जा मागून
न्हाय म्हणीत न्हाईत जतरकरी
तुझा 'बा' गेलाय
उपाशीच कामाला
यील आता भुक्याजून
जेवायचा वकुतबी टळून गेलाय
पुन्हा आल्यावं बघ तू टीवी
आन् मग किरकेटबी खेळ
उपाशीतापाशी उन्हातान्हात
कसं खेळू तरी वाटतं रं तुमास्नी
माझ्या तोंडाबाबी चवंच न्हाय
तिकट मिकाट खाऊ वाटतंय.
पर आणायचं कुठनं
जा रं माझ्या लेकरा जा ?
तू सुदीक वाटीभर खाशील
जा रं ! सोन्या जा ?
म्हसुबाच्या बागंत जा
डिचकीभर आमटी आनजा जा ?"

ही संपूर्ण कविताच ग्रामीण भाषेच्या ढंगात उतरलेली आहे. याशिवाय 'माझा बा' (आयुष्याच्या वाटेवर, पृ. ३९) या कवितेतून शेतकऱ्यांचे दुःख ग्रामीण भाषेत व्यक्त झाले आहे. 'उन्हाळा', 'पाऊस', 'भाऊबीज' (जगणे माझे), 'धनी माझा ग

बाई' (आकाश पेलताना, पृ. १५) या सर्व कविता ग्रामीण भाषेच्या वळणाच्या आहेत. शिवाय ग्रामीण भागातले शब्दही काही कवितेत आवर्जून वापरले आहेत. उदा. 'कळणा कोंडा', 'किरपा', 'सदरा', 'प्वॉट', 'पुसती', 'माडगं', 'झन्नाट', 'धनी', 'इंगुळ', 'धडूतं', 'डबडं' अशा अनेक ग्रामीण शब्दांच्या वापरामुळे ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतून त्या भागातील ग्रामीण लोकांच्या सुख-दुःखाचे हुबेहुब चित्रण आले आहे. कविता वाचत असताना कवीने मांडलेला प्रसंग, तो परिसर, त्या व्यक्ती आपल्या डोळ्यासमोर उभ्या राहतात हे ज्ञानेश्वर कोळींच्या भाषेचे मोठे यश आहे. त्यांच्या कवितेतील भाषा कुठेही क्लिष्ट, दुर्बोध झालेली नसून साध्यासोप्या शब्दात कवीने आपल्या भावना वाचकापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

## ३) ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतील प्रतिमासृष्टीचे स्वरूप :

प्रतिमा निर्माण करणे हा भाषेचा एक अंगभूत गुणधर्म आहे. प्रतिमेतून ऐंद्रिय संवेदनेचे प्रकटीकरण होते. प्रतिमेची व्याख्या करताना गो.वि. करंदीकर लिहितात,

''कल्पनेच्या पातळीवर इंदियगोचर होऊ शकणारा व जाणिवेने भारलेला कवितेचा प्राथमिक घटक म्हणजे प्रतिमा होय.''[३]

तर प्रतिमेची व्याख्या करताना सुधीर रसाळ लिहितात,

''प्रतिमा म्हणजे उच्चारांनी चिन्हांकित होणाऱ्या दोन किंवा अधिक मानसिक संदर्भामध्ये म्हणजेच त्यातील संवेदनाकृती व तत्संलग्न भावनिक, वैचारिक घटक यामध्ये घडणाऱ्या साधर्म्य वैधर्म्याधिष्ठीत आंतरप्रक्रियेतून निर्माण होणारी मूर्त, गतिशील अनेकार्थी व सेंद्रिय संघटना.''[४]

आधुनिक काळात तर प्रतिमा वापराला अधिकच महत्त्व प्राप्त झाले आहे.

प्रतिमा म्हणजे कवीच्या भावमय जीवनाचे प्रतिरूपच बनत आहे. काव्यातील जाणिवा योग्य त्या संवेदनाद्वारे तात्काळपणे रसिकांच्या मनात उमटविण्याचे कार्य प्रतिमा करतात.

ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेत वैविध्यपूर्ण प्रतिमाविश्व साकारले आहे. निसर्गप्रतिमा, स्त्री प्रतिमा, पौराणिक प्रतिमा, नाद प्रतिमा, गंध प्रतिमा, रंग प्रतिमा, स्पर्श प्रतिमा, चित्र प्रतिमा, पशू-पक्षी प्रतिमा साकारल्या आहेत. त्यापैकी काही वैशिष्ट्यपूर्ण प्रतिमांचा विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

**कोळींच्या कवितेतील निसर्गप्रतिमा :**

ग्रामीण भागातील सभोवतालचा परिसर कोळींचा सखासोबती असलेला पहावयास मिळतो. त्यामुळे त्यांच्या कवितेत निसर्गप्रतिमा विपुल येतात. कोळींच्या कवितेतून येणारा निसर्ग हा स्वत: कोळींना प्रतीत झालेला निसर्ग असल्यामुळे त्यांच्या कवितेतील निसर्ग प्रतिमा सहजतेने येताना दिसतात. त्यांच्या काही कविता तर पूर्ण प्रतिमारूपानेच अवतारताना दिसतात. उदा. म्हणून त्यांची 'माझा कृष्णाकाठ' ही कविता पाहता येईल.

''माझ्या कृष्णेच्या काठाला गड्या नारळ गुळाचे
बागा केळीच्या फुलल्या रान तांबूस मळीचे ।।
माझ्या कृष्णेच्या काठाला मोर डौलाने डोलतो
काळ्याशार मातीतुनी हिरवा पिसारा फुलतो ।।
माझ्या कृष्णेच्या काठाला माणसांचं पिक येतं
दिल्ली, मुंबईत त्याला मोल हिऱ्याच लाभतं ।।
माझ्या कृष्णेच्या काठाला राजकीय नातीगोती
विचारांच्या एकीसाठी एका ताटात जेवती ।।
माझ्या कृष्णेच्या काठाला चिरेबंदी जुनं वाडं

देशामंधी उगवलं सर्कशीचं पहिलं झाड ।।
माझ्या कृष्णेच्या काठाला तीर्थ दत्ताचं रं मोठं
म्हसोबाच्या शिवारात चिंचबनाची रं पेठ ।।''
('माझा कृष्णाकाठ', घन दाटलेले,पृ. ५२)

किंवा -

''झन्नाट पाऊस
उधळत आला
भिजल्या रानात
रंग सांडला ।।
उन्हाची तिरिप
दिस हसला
मातीच्या कुशीत
कोंब रूजला ।।'' ('झन्नाट पाऊस', आकाश पेलताना, पृ.१३)

या कवितेत निसर्गातील घटकावर मानवी जीवनातील घटकांचे आरोपन करीत कवीने काही प्रतिमा वापरल्या आहेत. कोळींच्या कवितेत येणाऱ्या महत्त्वपूर्ण निसर्ग प्रतिमा पुढीलप्रमाणे -

'चंद्र', ढग, आकाश, सूर्य, पाऊस, चांदणं, पौर्णिमा, नदी, ('जगणे माझे'), तारा, उल्कापात, सागराच्या लाटा, दाट धुके, डोंगर घाट, श्रावण, उन्हाच्या चिंध्या, झाडे, ध्रुव तारा, ('आकाश पेलताना'), रानेवने, आजारी पृथ्वी, हताश सूर्य, रानझरा ('घन दाटलेले').

### श्री. कोळींच्या कवितेतील पशू-पक्षी प्रतिमा :

ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेत भरपूर प्रमाणात पशू-पक्षी प्रतिमा अवतरलेल्या आहेत. पशू-पक्ष्यांचे अंगभूत स्वभावगुण दर्शवून अतिशय समर्पक ठिकाणी या प्रतिमा अवतारतात. त्यापैकी काही महत्त्वपूर्ण प्रतिमा पुढीलप्रमाणे -

| वापरलेली प्रतिमा | पृष्ठ क्रमांक | काव्यसंग्रहाचे नाव |
|---|---|---|
| स्वार्थांध बगळे | पृ. २ | जगणे माझे |
| कोंबडा, कोंबडी | पृ. ४ | जगणे माझे |
| मैना, कोकीळा, चिमण्या | पृ. ११ | आयुष्याच्या वाटेवर |
| घुबड, टिटवी | पृ. १२ | आयुष्याच्या वाटेवर |
| वासरू, गाय | पृ. ९ | जगणे माझे |
| साप, मुंगुस | पृ. ४७ | आयुष्याच्या वाटेवर |
| कोल्हे कुत्री | पृ. ३३ | घन दाटलेले |
| बेडून, साप, विंचू, श्वान | पृ. ४१ | आकाश पेलताना |
| नाग, सिंह | पृ. ३७ | आकाश पेलताना |
| फुलपाखरे | पृ. २० | घन दाटलेले |
| म्हैस, बैल, शेळी | पृ. ३५ | आयुष्याच्या वाटेवर |
| कावळा | पृ. २६ | जगणे माझे |
| गिधाडे | पृ. ३५ | जगणे माझे |
| मांजर, उंदिर | पृ. १० | आयुष्याच्या वाटेवर |
| घुबड, टिटवी | पृ. १२ | आयुष्याच्या वाटेवर |
| माकड, मुंगळा | पृ. २५ | आयुष्याच्या वाटेवर |
| पांढरा हत्ती | पृ. २६ | आयुष्याच्या वाटेवर |
| पारवा | पृ. २८ | आयुष्याच्या वाटेवर |
| वटवाघुळे | पृ. ४१ | घन दाटलेले |
| मेंढरांचा कळप | पृ. ३६ | आयुष्याच्या वाटेवर |

या व अशा कितीतरी पशू-पक्षी प्रतिमा कोळींच्या कवितेत आलेल्या आहेत. या प्रतिमांमुळे कविता अधिक सूचक झालेल्या आहेत. स्वार्थी लोकांसाठी बगळ्याची,

कावळ्याची प्रतिमा कोळी वापरतात. 'वासरू आणि गाय' यांच्या प्रतिमेतून आई-मुलाचे प्रेम व्यक्त करतात. काही प्रतिमांतून माणसाची झालेली विदीर्ण अवस्था टिपलेली आहे. उदा.

''त्यातून सूडचा जन्म झाला तेव्हा
जिंदगी फासाकडे गेली
फांदी सुटलेल्या माकडासारखी
ढुंगण तुटलेल्या मुंगळ्यासारखी ''

('शिकलो तेव्हा', आयुष्याच्या वाटेवर, पृ.२५)

**कोळींच्या कवितेतील स्त्री प्रतिमा :**

ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतून स्त्रीची अनेक रूपे प्रकट होतात. कधी सखी, मैत्रीण म्हणून ही स्त्री भेटते तर कधी आई-बहीण म्हणून भेटते. उदा. साठी पुढील स्त्री प्रतिमा पाहू.

'माता' (जगणे माझे, पृ.१), 'बाळंतीण', 'सासूरवाशीण' (जगणे माझे, पृ.९), 'मुरळी' (जगणे माझे,पृ. ११), 'सुन' (जगणे माझे, पृ. १९), 'लेक', 'माऊली', 'बहीण ताई' (जगणे माझे, पृ.१८), 'पोरी' (आयुष्याच्या वाटेवर, पृ. ३२), 'आई' (आकाश पेलताना, पृ.५३), 'बायको' (घन दाटलेले, पृ.५), 'नववधू' (जगणे माझे,पृ.२७), 'वहिणी', 'रंडकी' (जगणे माझे,पृ.२९), 'पतिव्रता ' (जगणे माझे, पृ.३८), 'सखी' (आकाश पेलताना, पृ.५२)

अशा विविध स्त्री प्रतिमा कोळींच्या कवितेत अवतरलेल्या आहेत. काही कवितेत तर स्त्री प्रतिमांची मालिकाच अवतरते. उदा. म्हणून 'भाऊबीज' ही कविता पाहू.

''दिवाळीच्या सणासाठी
लेक माहेरा येती

माहेर अंगणी
माय माऊली हासती
पुसती बहीण
पाठराख्या भावास
काय ओवाळणी तुझी
तुझ्या या बहिणीस
अग, अग ताई
दोन दिसांची तू पाहुणी
पाठराख्या बंधूस
ये ग तू दारास '' ('भाऊबीज', जगणे माझे, पृ.१८)

ही संपूर्ण कविताच प्रतिमांकीत झालेली आढळते.

## कोळींच्या कवितेतील पौराणिक प्रतिमा :

कोळींनी आपल्या कवितेत पौराणिक प्रतिमांचाही वापर केलेला आहे. त्यातील काही महत्त्वपूर्ण प्रतिमा पुढीलप्रमाणे –

'खंडोबा' (जगणे माझे, पृ.११), 'कर्ण', 'कुंती', 'पांडव' (जगणे माझे, पृ.१५), 'सावित्री', 'कान्होपात्रा', 'गाडगेबाबा' (जगणे माझे, पृ.२४), 'येशू', 'पैगंबर', 'ज्ञानेश्वर', 'तुकाराम', 'मार्क्स' (आयुष्याच्या वाटेवर, पृ. ७), 'विठ्ठल', 'ज्ञानेश्वर', 'जनाबाई' (आकाश पेलताना, पृ.१६), 'दामाजी', 'रामदास' (आकाश पेलताना, पृ. ३०), 'येशू', 'वाल्या', 'राम' (आकाश पेलताना, पृ.३४), 'रामदास', 'साधुदास', 'बाबासाहेब' (घन दाटलेले, पृ.५२), 'श्रावण बाळ', 'दशरथराजा' (जगणे माझे, पृ.२६), 'हरी' (आकाश पेलताना, पृ.१६)

पौराणिक प्रतिमेच्या दृष्टीने 'ऐसी माझी पंढरी' कविता पहाण्यासारखी आहे.

''ज्ञानियाची पालखी

अन तुक्याचा सोहळा

जनाईच्या मुखातुनी

अमृत उमाळा'' ('ऐसी माझी पंढरी', आकाश पेलताना, पृ.१६)

किंवा

''मला मुंडक्याच्या डोळ्यात

येशू, पैगंबर, ज्ञानेश्वर, तुकाराम, मार्कस्

ओघळताना दिसले आणि....

रक्ताच्या डबक्यात

रामायण, महाभारत, इलियड, ओडिसी

गोठताना दिसली.''

('खाटकाच्या दुकानात', आयुष्याच्या वाटेवर, पृ.७)

या कवितेतून पौराणिक प्रतिमांची पूर्ण मालिकाच आलेली आहे.

**कोळींच्या कवितेतील नाद प्रतिमा :**

ज्ञानेश्वर कोळी आपल्या कविता गाऊन दाखवतात. त्यामुळे त्यांना नादलयीचे आकर्षण असलेले पदोपदी जाणवते. त्यांच्या अनेक कवितेतून या नादप्रतिमा आढळून येतात.

| प्रतिमा | पृष्ठ क्रमांक | काव्यसंग्रहाचे नांव |
|---|---|---|
| पैंजणाचा आवाज | पृ. १८ | जगणे माझे |
| फिदी फिदी हसणे | पृ. २५ | जगणे माझे |
| पावलाची धून | पृ. १५ | आयुष्याच्या वाटेवर |
| पालीचे चुकचुकणे | पृ. १२ | आयुष्याच्या वाटेवर |
| दबक्या ढोलक्याचा आवाज | पृ. २० | आयुष्याच्या वाटेवर |
| फोटोचे थडथडणे | पृ. २४ | आयुष्याच्या वाटेवर |

| प्रतिमा | पृष्ठ क्रमांक | काव्यसंग्रहाचे नांव |
|---|---|---|
| भैरवी आळवणे | पृ. २८ | आयुष्याच्या वाटेवर |
| खळखळणारा ओढा | पृ. ३३ | आयुष्याच्या वाटेवर |
| विमानाची घर्रघर्र | पृ. ३८ | आयुष्याच्या वाटेवर |
| झिमझिम पाऊस, विजेचा कडकडाट | पृ. ४२ | आयुष्याच्या वाटेवर |
| पंखांचे फडफडणे | पृ. ४४ | आकाश पेलताना |
| पानांची सळसळ | पृ. ६० | आकाश पेलताना |
| घनाचे गर्जणे | पृ. ४ | आकाश पेलताना |
| टाळ चिपळ्यांचा नाद | पृ. १० | आकाश पेलताना |
| मण्डुक संगीत | पृ. १३ | आकाश पेलताना |
| मृदंगाचे बोल | पृ. १६ | आकाश पेलताना |
| हरनिमाचा गजर | पृ. १६ | आकाश पेलताना |
| रटारटा, खळाखळा | पृ. ३२ | आकाश पेलताना |
| धडधडणे | पृ. ३५ | आकाश पेलताना |
| कॅसेटची धून | पृ. ४५ | आकाश पेलताना |
| बांगड्यांची किनकिन | पृ. ५२ | आकाश पेलताना |
| टपकन गळणे | पृ. ३७ | घन दाटलेले |
| चिवचिव | पृ. १६ | घन दाटलेले |
| बदबद | पृ. ४१ | घन दाटलेले |
| करकरणारा पलंग | पृ. ३५ | घन दाटलेले |
| कुडकुडणे | पृ. ४१ | घन दाटलेले |
| भूर्रकन उडणे | पृ. ५१ | घन दाटलेले |
| टाक डुई-डुई | पृ. २० | जगणे माझे |

कवितेतून आलेल्या या सर्व नादप्रतिमा वैशिष्ट्यपूर्ण वाटतात. या प्रतिमामुळे कवितेला एकप्रकारचे लयबद्ध रूप प्राप्त झाले आहे.

**कोळींच्या कवितेतील रंग प्रतिमा :**

कोळींच्या कवितेत आलेल्या रंगप्रतिमांना अगणित रंगछटा प्राप्त झालेल्या आहेत. उदा. 'तांबड्या पिवळ्या आंशेच्या सुरकुत्या' (जगणे माझे, पृ.७), 'लालसा टिळा' (जगणे माझे, पृ.५२), 'पिवळेशार अंगण' (जगणे माझे, पृ.१२), 'डोळे पांढरे पडणे' (आकाश पेलताना, पृ.२), 'गोरे गाल' (आकाश पेलताना, पृ.२०), 'काळं रान' (आकाश पेलताना, पृ.२१), 'सावळे शब्द' (जगणे माझे, पृ.१४), 'काळी कुट्ट रात्र' (जगणे माझे, पृ.१५), 'लालरक्त' (जगणे माझे, पृ.२८), 'हिरवी झाडे' (आकाश पेलताना, पृ.२८), 'भगवा प्रकाश' (आकाश पेलताना, पृ.५५), 'काजळी रंग' (घन दाटलेले, पृ.१७), 'लालक्रांती' (आकाश पेलताना, पृ.२८), 'गुलाबी लाल' (जगणे माझे, पृ.४०) इ. रंगप्रतिमा वैशिष्ट्यपूर्ण वाटतात. कवितेत योग्य त्या ठिकाणी या प्रतिमांची योजना केल्यामुळे कविता अधिक परिणामकारक ठरलेल्या आहेत.

**कोळींच्या कवितेतील गंध प्रतिमा :**

कोळींच्या कवितेत अनेक वैशिष्ट्यपूर्ण गंधप्रतिमा अवतरतात. 'करंजीचा वास', 'बासुंदीचा वास' (जगणे माझे, पृ.२३), 'सुगंधी दिशा' (जगणे माझे, पृ.४०), 'चंदनाचा गंध' (आकाश पेलताना, पृ.१६), 'कवितेचा सुगंधी वास' (घन दाटलेले, पृ.१), 'वादळी गंध' (आकाश पेलताना, पृ.४), 'मातीचा गं' (आकाश पेलताना, पृ.२५), 'धुंदगंध', 'स्वप्नगंध' (आकाश पेलताना, पृ.८)

वाचकाला तृप्ततेचा आनंद देण्याइतक्या या गंधप्रतिमा प्रभावी आहेत. उदा.

''चंदनाचा गंध संत
किर्तन करीती

हरिनामाचा गजर

पंढरी डोलती " ('ऐसी माझी पंढरी', 'आकाश पेलताना', पृ.१६)

श्री. कोळी यांच्या काव्यातील अशा विविध प्रतिमांमध्ये निसर्ग, स्त्री, पशू-पक्षी, नाद अशा प्रतिमांचे अधिक्य जाणवते. त्यांची प्रतिमासृष्टी समृद्ध असल्याने अनेक प्रतिमा सहजतेने येतात. या प्रतिमांतून कवीच्या भावनांचे दर्शन समर्थपणे घडते. त्यांच्या कवितेतील प्रतिमांचे स्वरूप पाहिल्यानंतर कविता ही प्रतिमांची संघटना असल्याचे जाणवते व इंद्रिय संवेदनात्मक प्रतिमेचे महत्त्व लक्षात येते.

पशू-पक्ष्यांच्या प्रतिमेतून तर कोळींनी एक अभिनव शैलीच मांडलेली दिसते. कवीने कवितेत व्यक्त केलेली जाणीव योग्य त्या संवेदनाद्वारे तात्काळपणे वाचकाच्या मनात उमटवण्यात कोळींच्या कवितेतील प्रतिमा यशस्वी ठरतात. प्रभावी व समर्थ प्रतिमा वापरल्याने त्यांच्या कवितेतील आशय अर्थपूर्ण बनला आहे. त्यांच्या कवितेत असंख्य प्रतिमा अवतरल्याने सर्वच प्रतिमांचा विचार करणे शक्य झाले नाही. वैशिष्ट्यपूर्ण प्रतिमांचाच विचार केलेला आहे.

## ४) ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतील मुक्तछंदाचे स्वरूप :

कवितेतून आपल्या भावना मांडत असताना ज्ञानेश्वर कोळींनी मुक्तछंदाचा वापरही केला आहे. छंद आणि वृत्तांचे बंधन न पाळता मुक्तपणे विचार मांडण्यासाठी त्यांनी लिहिलेल्या मुक्तछंदात्मक कवितेची पुढील उदाहरणे सांगता येतील.

"दिवसाच्या सांद्रीतून
जगण्याची गाठोडी घेऊन धावणारे
सत्कार पुरस्कार-प्रतिष्ठा-सत्ता
कारखाने-बंगले-प्रेमिकांचे चाळे
सोहळ्यांच्या पंक्ती
किती आनंदी आनंद "

('दिवसभर', आकाश पेलताना, पृ.४५)

किंवा

"घटका घटकाला ठसका लागतो माणूसकीचा
युगा-युगांच्या इतिहासाची धाप लागते
हत्ती घोड्यांना गोंजारीत गेली कित्येक वर्ष असाच जगतोय
माझे दु:खच मैलोनमैल पसरलेले "

('मी आणि माझे जंगल', आकाश पेलताना, पृ. ५५)

'माडगं' (आयुष्याच्या वाटेवर, पृ.३६), 'चित्रास पत्र' (आयुष्याया वाटेवर, पृ.४७), 'दिवसभर' (आकाश पेलताना, पृ.५६), 'गजबजलेलं गाव' (घन दाटलेले, पृ.२८), 'वज्रलेप' (घन दाटलेले, पृ.२९), 'चिरलेले दरवाजे' (घन दाटलेले, पृ. ३१), 'या रे दु:खानो या !', (आयुष्याच्या वाटेवर, पृ. ४७), 'वास्तवता' (आकाश पेलताना, पृ. ५६), 'आमची गाय' (आकाश पेलताना, पृ. ५७), 'अस्तित्वाच्या शोधात' (घन दाटलेले, पृ.३३), 'चिंताग्रस्त' (घन दाटलेले, पृ.३९) याबरोबरच आयुष्याच्या वाटेवर मधील 'प्रवाह', 'मध्यस्थी', 'गारोडी', 'ती रात्र', 'त्रिभुज प्रदेश', 'नमुना आणि नोंद', 'देवाच्या दारात', 'एक पतंग', 'कुठे गेलेत सगळे' या कविता मुक्तछंदातील सकस आणि वैचारिक आशयाच्या कविता आहे.

कवितेला अर्थपूर्ण लय देण्यासाठी ज्ञानेश्वर कोळींनी उच्चारानुसार आघातांवर आधारलेली मुक्तछंदात्मक रचना केलेली आढळते.

## ५) ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेत झालेला अलंकाराचा वापर :

अलंकाराच्या वापरामुळे कवीचे म्हणणे अधिक स्पष्टपणे समजते व कवीच्या भावभावना वाचकापर्यंत पोहचतात. काव्य सुशोभित करून अलंकार भाषेमध्ये अधिक्य आणतात. अलंकार म्हणजे काय हे सांगताना मो.रा. वाळंबे लिहितात,

"भाषेला ज्याच्यामुळे शोभा येते त्या गुणधर्मांना 'भाषेचे अलंकार' असे म्हणतात." ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेत विविध अलंकार योग्यपणे वापरलेले दिसून

येतात. काव्यसंग्रहातील कवितांवर 'यमक' अलंकाराचे प्राबल्य जाणवते. अनुप्रास, उपमा, उत्प्रेक्षा इत्यादी अलंकाराचा वापर योग्यप्रकारे केलेला आढळतो. उदाहरणादाखल काही अलंकाराचे स्वरूप पाहू

अनुप्रास - कवितेच्या चरणात एकाच अक्षराची पुनरावृत्ती होऊन त्यातील नादामुळे त्याला सौंदर्य प्राप्त होणे म्हणजेच अनुप्रास. अनुप्रासाची अनेक उदाहरणे ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेत आढळतात.

''टाकडुईऽ डुईऽ टाक डुईडुई
आमचं भयाण जगनं हायी ''
('टाक डुई-डुई', आयुष्याच्या वाटेवर, पृ.२०)

किंवा

''भीक बंद शिक्षा बंद
पाऊसबंद वारा बंद
झोपडीतला दिवा बंद ''
('बंद' जगणे माझे पृ. ३३)

'पेरणी' (जगणे माझे, पृ.३४), या कवितेत 'पेरणी' हा शब्द पुन:पुन्हा येतो. 'बंद' ('आयुष्याच्या वाटेवर', पृ.२७) या कवितेत बंद हा शब्द पुन:पुन्हा येतो. तर -

''माणूस जपावा
माणूस जोजावा
माणूस पुजावा....माणसाने.''
('पुतळा', घन दाटलेले, पृ. १५)

या कवितेत 'माणूस' शब्द पुन:पुन्हा वापरल्याने नादनिर्मिती झाली आहे. शब्दपुनरूक्तीच्या दृष्टीने 'पानांची सळसळ' (आकाश पेलताना, पृ.६०) ही कविता महत्त्वपूर्ण आहे.

**यमक –**

ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेत यमक अलंकार जादा प्रकणात आढळतो. अंत्ययमक साधल्यामुळे त्यांच्या कविता नादमय, लयबद्ध वाटतात.

''ऋषीमुनींचे काय झाले
.महात्म्यांनी काय केले
सोन्याचा धूर होता काय
पुराणात घडलेले काय
हाच नकाशा पुन्हा काढू
देश आपला नवा घडवू''

('देश आपला नवा घडवू', आकाश पेलताना, पृ.३०)

किंवा

''सामाजिक क्षेत्रात लाच आहे
राजकीय क्षेत्र कुजलं आहे
शैक्षणिक क्षेत्र सडलं आहे
आर्थिक क्षेत्र बाटलं आहे ''

('माणसा', जगणे माझे, पृ. ३)

प्रस्तुत कवितेत चरणाच्या शेवटी अक्षरांची पुनरावृत्ती आहे. 'माणसं राखून असल्यालं बरं असतं !' (जगणे माझे, पृ. २७), 'माझा कृष्णाकाठ' (घन दाटलेले, पृ.५२), 'मानवा' (जगणे माझे, पृ.२७), 'कविता एक ज्योत' (घन दाटलेले, पृ. ११) अशा अनेक कवितेत यमकपूर्ण रचना आहे.

''घराघरावर आज पसरली थंडीची लाट
धुक्यात लपल्या घरट्याची मी रोज शोधतो वाट ''

('थंडीची लाट', आकाश पेलताना, पृ. ५९)

किंवा

“माझ्या कृष्णेच्या काठाला मोर डौलाने डोलतो
काळ्याशार मातीतुनी हिरवा पिसारा फुलतो”
(‘माझा कृष्णाकाठ’, घन दाटलेले, पृ.५२)

**चेतनागुणोक्ती –**

चेतनागुणोक्ती, अलंकाराचाही सफाईदारपणे वापर कोळींनी केलेला आहे. त्यादृष्टीने ‘दान’ (जगणे माझे, पृ. १५), ‘माझं प्रेत’ (जगणे माझे, पृ.२५), ‘घन गर्जत गर्जत’ (आकाश पेलताना, पृ.४), ‘काळे पांढरे उंदीर’ (आकाश पेलताना, पृ. ४१) या कवितातून निर्जिव वस्तू सजीव आहेत अशी कल्पना करून त्यांच्या मानवाप्रमाणे केलेल्या कृतीचे वर्णन आले आहे. त्या दृष्टीने ’फितुरी’ ही कविता महत्त्वपूर्ण आहे.

“सारे ढगच फितुर झाल्याने
बदलणाऱ्या ऋतुत
अवकाशातील ग्रह
हवालदील झाले ।
तेव्हा मी........
तारकांना विचारलं......
आपल्या झाडाचं आणि
गवताचं काय
प्रलयकाळ
गवताच्या पात्यांनी
हळूच उत्तर दिलं ।”
( ‘फितुरी‘,आकाश पेलताना, पृ.४३ )

वेगवेगळ्या अलंकाराच्या साहाय्याने कवीने आपला अनुभव अधिक स्पष्टपणे वाचकापर्यंत पोहचविला आहे.

## ६) हिंदी – इंग्रजी शब्दांचा वापर :

ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेत आलेल्या हिंदी-इंग्रजी शब्दांचा वापरामुळे कवितेचा आशय अर्थपूर्ण व प्रभावीपणे साकारलेला आहे.

**'आयष्याच्या वाटेवर' काव्यसंग्रहात आलेले** : 'सिना, गर्दन' (पृ.७), 'जिंदगी' (पृ.२५), 'सलाम' (पृ.३८), 'नॉनसेन्स', 'लेझी', 'क्रेझी' (पृ.२९), 'ऑफिस' (पृ.३१), 'बँडेज' (पृ.४२).

**'आकाश पेलताना' काव्यसंग्रहातील शब्द :** 'इस्टेट' (पृ.७), 'स्टेअरिंग', 'स्पेअरपार्ट', 'प्यून', 'व्ही.आय.पी.' (पृ.३६), 'अपार्टमेंट', 'स्टँडर्ड' (पृ.४०)

**'घन दाटलेले' :** 'नेम प्लेट' (पृ.३५)

अशा हिंदी-इंग्रजी शब्दांचा नेमकेपणाने वापर कवीने केलेला आहे. त्याचे उदाहरण म्हणून पुढील कविता पाहू.

''व्ही.आय.पी. पासून ते प्यूनपर्यंतचे सर्व
स्पेअरपार्ट तयार केले जातात
लोकशाहीचा कणाही
इथचं घडवला जातोय''

('माफ करा शांतनुराव', आकाश पेलताना, पृ.३६)

कवीने इंग्रजी शब्दांच्या वापराने योग्य परिणाम साधलेला जाणवतो.

## सारांश :

ज्ञानेश्वर कोळींच्या काव्याभिव्यक्तीचे स्वरूप विविधांगी आहे. काव्यरचनेचे अनेक प्रकार ते सहजपणे हाताळताना दिसतात. मुक्तछंदापासून अभंग-ओवी पर्यंत

त्यांच्या काव्यरचनेचा प्रवास पहावयास मिळतो. स्वत:ची खास ग्रामीण शब्दकळा घेऊन त्यांची कविता अवतरते. विविध प्रतिमा व अलंकाराचा कवीने केलेला वापर उल्लेखनीय आहे. इंग्रजी व हिंदी शब्दांच्या वापराने त्यांची कविता अधिक अर्थपूर्ण असल्याचे आढळते. कवीने वापरलेली भाषा सहजसोपी असल्याने वाचकाला कवितेचा अर्थ सहजपणे उमजतो. अनुभवाचा अस्सलपणा व अनुभव साकार करण्यातली कलात्मकता यामुळे कोळींची कविता जिवंत वाटते.

## ७) ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतून अभिव्यक्त झालेला समाज :

कवी ज्ञानेश्वर कोळी ग्रामीण भागात राहणारे, ग्रामीण भागाशी तेथील जीवनाशी समरस झालेले कवी आहेत. त्यामुळे त्यांच्या कवितेत ग्रामीण भागातील समाज, त्यांची रहाणी, त्यांचे कष्ट, होरपळ, एकीकडे बंगले व दुसरीकडे झोपड्या ही विषमता, पिढीजात व्यवसाय, प्रथा-परंपरा या सर्वांचे वर्णन प्रखर वास्तवतेने रेखाटलेले आहे. 'सामान्य माणसाचे जगणे' हा त्यांच्या काव्याचा केंद्रबिंदू आहे. गरिबी, उपासमार, वेदना, जगणे, दु:ख भोगणे या सगळ्यांबरोबरच बदलत चाललेला समाज, आधुनिकीकरण, यांत्रिकीकरण, संगणकीकरण याचा समाजावर होणारा परिणाम कोळींच्या कवितेत उमटला आहे. कोळींच्या कवितेतून व्यक्त होणाऱ्या भावना सर्व गावाचे, गावातील जनसमूहाचे जगणे व्यक्त करतात.

> "काल माझ्या गावात आभाळासहीत पाऊस कोसळला
> जमीन लबलबीत झाली, दु:खाचे अंकुर फोफावू लागले"
>
> ('आयुष्याच्या वाटेवर', पृ. ९)

हे दु:ख केवळ वैयक्तिक कवीचे नाही तर ग्रामीण समाजाचे आहे. कवीला या समाजाविषयी आत्मियता आहे, कळवळा आहे म्हणूनच गावातील अनावश्यक बदल, संपत चाललेली माणूसकी, बदलत चाललेला समाज याची खंत कवीच्या मनाला बोचत आहे. एकेकाळी हाच गाव आपुलकीनं भारलेला होता. अनेक

महामानव याच गावात होऊन गेले. मात्र आता त्यांचे स्मरणही गावाला होत नाही. गावातील जुने ऐतिहासिक ऐवज पाहून कवीला गावाच्या गतकालीन वैभवाची आठवण होते. 'गजबजलेलं गाव' याकवितेत कवी लिहितो –

''हे गजबजलेलं गाव
माळवदी घरांची जुनाट पडझड
ऐतिहासिक ऐवजांचे विखुरलेले तुकडे
तुकड्यांच्या प्रदर्शनाने
कधी तरी सळसळते एखाद्याचे रक्त''

('घन दाटलेले', पृ. २८)

गावात नवनव्या योजना येतात. डांबरी रस्ते होतात, दळणवळण वाढते. दुरदर्शन–दुरध्वनी असे आधुनिकतेचे वारे वाहते. निवडणुका जवळ आल्या की नेते गावात येतात. लोकांना जेवण देतात. गावात गट–तट, हेवे–दावे वाढतात. गावात भौतिक सुधारणा झाली मात्र माणूस माणसापासून दुरावला. जिव्हाळा संपू लागला. रेशनिंगला साखर आणि रॉकेलसाठी रांगा लावणारी सामान्य जनता मात्र थकून गेली. खेड्यातील लोकांच्या जीवनाचे वास्तव चित्रण 'असे माझे गाव' कवितेत आले आहे.

''गाव बुडाले–बुडाले
गर्द अंधाऱ्या रातीत
आणि गाव गुडुपले
असेमाझे गाव झाले ।।''

('घन दाटलेले', पृ.२७)

ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतील समाज हा कष्टकऱ्यांचा आहे. आराम, चैन त्यांच्या आयुष्यात डोकावतही नाही. जन्मत: कष्ट, दारिद्रय, भूक त्यांच्या आयुष्याला चिटकते. त्यांना स्थैर्य, कधीही लाभले नाही. इथे जन्मणारे मुल कर्जात वाढते, कर्जात जगते आणि त्याचा शेवटही कर्जातच होतो. 'घरकुल' कवितेत कवी लिहितात,

''कर्जात वाढलो मी कर्जात जगलो मी
गेलो जगून तरीही ते कर्ज का फिटेना ।।''
('घन दाटलेले', पृ.८)

अशी अवस्था असते. घरातील कर्ता माणूस 'बा' उपासपोटी राबत असतो. मुलांची पोटं भरण्यासाठी झटत असतो. 'माय'ची अवस्था तिच ! ती 'बा'च्या बरोबरीनं कष्ट करते. दारिद्र्याशी संघर्ष करते. आपल्या धन्यासाठी परमेश्वराकडे आयुष्य मागते. चवीचं जेवण कधी या कष्टकऱ्यांच्या नशिबीच नसे. रानातून भाजीपाला आणला जायचा. कुंजीर, तांदळ, पात्रंची भाजी अशा रानात आपोआप उगवणाऱ्या, फुकट मिळणाऱ्या भाज्याच गरिबांच्या घरी शिजतात याचेच वर्णन 'आकाशात झेप' या कवितेत आले आहे.

''जळान काटक्या गोळा करून
भाजीच निवडत बसायची
संध्याकाळच्या जेवणाला
पात्रंची भाजी करायची
उंबराच्या दोड्या सकाळी शिजवून शाळंत आम्हाला घालवायचं ''
('आकाश पेलताना', पृ.३२)

कोळींच्या कवितेतील समाज शेतात राबणारा आहे. तो शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर आहे. भांडवलाअभावी हा शेतकरी पारंपरिक शेती पिकवतो. त्याला जमीनही भरपूर नाही. वाटून आलेल्या तेवढ्याच जमिनीत वेगवेगळी पिकं घेऊन जगण्याची धडपड करणारा हा समाज आहे. एकाच रानात अनेक पिकांची दाटी, त्यातच गवत माजलेलं, रानाला मीठ फुटलेलं, कसदार नसलेलं धान्य ही वास्तव स्थिती 'नुसतंच रान' कवितेत स्पष्ट झाली आहे.

''एक एकर वाटून आला
.एकाच रानात ऊस हाय

मधल्या सरीत गहू पेरलाय
बांधावरच मका टोकलाय
इवल्याशा रानावर
कसंतरी जगायचं हाय ।''

('आकाश पेलताना', पृ.३९)

ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतील समाज हा सामान्य माणसांचा आहे. स्वातंत्र्यानंतर या समाजाची स्वप्ने भंगलेली आहेत. स्वातंत्र्य मिळाल्यावर अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण या किमान गरजा भागतील अशी सर्वांचीच अपेक्षा होती. परंतु घडले नेमके उलटे. स्वातंत्र्याचा फायदा या समाजातील सामान्यांपर्यंत पोहचूच शकला नाही. हीच भावना. 'खरंच मित्रानों' (घन दाटलेले, पृ.४७) आणि 'आमची गाय' ('आकाश पेलताना', पृ.५७) या कवितेत व्यक्त झाली आहे. या समाजात सामाजिक, आर्थिक विषमता आहे.

एकीकडे श्रीमंती तर दुसरीकडे गरिबी ही तफावत या समाजात आहे. गाडीतून फिरणारी, बंगल्यात राहणारी माणसेही आहेत. पोटासाठी डोक्यावर मरीआयचा गाडा घेऊन फिरणारे लोकही या समाजत आहेत. लाचारपणे जगण्यापेक्षा या समाजाला स्वाभिमानाने जगणेच आवडते. म्हणून भिकारी म्हणून जगण्यापेक्षा भुकेले राहणे त्यांना आवडते. 'छान' कवितेत कवी लिहितो,

''पाऊस झेलण्यापेक्षा
गोठलेली थंडी छान
भाकर शोधण्यापेक्षा
पोटात हिरकणी छान ''

('आयुष्याच्या वाटेवर', पृ.४६)

कोळींच्या कवितेतील 'समाजातील माणूस' हा इतरांकडून शोषिला जाणारा, नाडला जाणारा आहे. कवी भ्रष्ट पुढारी तर कधी स्वार्थी अधिकारी या लोकांच्या अगतिकतेचा फायदा घेतात. 'उन्हाळा' कवितेत ज्ञानेश्वर कोळी लिहितात –

"तलावाच्या कामावरी
रीघ कामीच लागली
सायबाच्या बंगल्याला
येळ धावूनच आली "

('जगणे माझे', पृ.९)

किंवा

"आता बरिक काय खरं न्हाय
एकांदा चांगला पुढारी गाठू या
त्येंच्या शुभहातानं पेरणीची पुजा करूया
आपली गाऱ्हानीपन त्यास्नी सांगू या
पन.....त्योबी म्हणतुया
मिरगाच्या चार धारा तरी पडू द्या
मग पुढं काय करायचं ते बघू या !"

**सारांश :**

ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेत अभिव्यक्त झालेला समाज हा बहुतांश खेड्यात राहणारा आहे. कष्टकरी, कामकरी, मजूर, कामगार, शेतकरी अशा विविध रूपात राबणारी ही माणसे कष्टमय जीवन जगणारी आहेत. परिस्थितीने गांजलेली वाकलेली ही माणसे संसारासाठी, मुलाबाळांसाठी खपत राहतात. महागाई, वाढती लोकसंख्या, वाढती स्पर्धा, शहरीकरण या सर्व गोष्टींची झळ या समाजाला पोहचते. सुधारणेचा आभास समाजाभोवती झाला आहे. मात्र वास्तव वेगळेच आहे. स्वस्त धान्य दुकानातली महागाई, रेशनिंगसाठी असणाऱ्या रांगा, वेगवेगळ्या योजनेतील फोलपणा

या समाजाला समजतो. स्वातंत्र्यानंतर दिवस बदलतील ही या समाजाची अपेक्षा फोल ठरली आहे. असा हा अडाणी, बेकार, ग्रामीण समाज, या समाजाची दु:खे कोळींच्या कवितेतून व्यक्त झाली आहेत.

## ८) मानवी जीवनाच्या विविध स्तरांचे व घटकांचे चित्रण :

ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेत समाजजीवनातील विविध स्तरांचे व घटकांचे वास्तव चित्रण आलेले आहे. आदिवासी, भटकी, अस्पृश्य म्हणून जगणारी, लमाणी, कडकलक्ष्मी, मुरळी,गारोडी, मदारी, भिकारी, मजूर, शेतकरी, कष्टकरी अशा अनेकविध स्तरात जगणारी माणसे, त्यांच्या भावना, त्यांचा संघर्ष, त्यांच्या वाट्याला येणारे दु:ख आणि परिस्थिती विरूद्ध लढण्यासाठी त्यांच्यात निर्माण झालेले भान या सर्वांचे वर्णन त्यांनी केलेले आहे.

मुरळी म्हणून जगणाऱ्या स्त्रीच्या मनातही काही स्वप्ने असतात. तिलाही तिच्या मनानुसार जगण्याचा, संसार फुलवण्याचा हक्क असतो. पण समाज तिच्यावर बंधने घालतो. तिला मुरळी बनवतो. खंडोबाच्या नावावर तिला भंडारा उधळत आयुष्य जगावे लागते. अशावेळी ही स्त्री आपल्या भविष्याचा विचार करते. आपले कसे होणार ? आपल्या मुलीचे कसे होणार ? तिलापण मुरळी म्हणूनच आयुष्य काढावे लागणार का ? अशावेळी तिचे मन समाजातल्या या वाईट प्रथेला दोष देऊ लागते. याचेच चित्रण 'मी धन्य झाले' या कवितेत आलेले आहे.

> ''मुरळी ! मुरळी !! मुरळी !!!
> अरे याच समाजातली मी तर स्त्री
> मला मुरळी तुम्हीच केलं
> मुरळी पदवीचा पिवळा भंडारा
> तुम्हीच उधळला !
> मुक्या देवापुढं उभं करून.

वासनेच्या जाळात तुम्हीच पेटवलं !''

('जगणे माझे', पृ.११)

मुरळी म्हणून जगणाऱ्या या स्त्रियांचे दु:ख, त्यांचे जगणे 'ऐक पोरी सांगते तुला !' ('आयुष्याच्या वाटेवर', पृ.३२) या कवितेतही चित्रित केलेले आहे. आयुष्यभर मुरळी म्हणून जगलेली स्त्री आपल्या वाट्याला आलेले दु:ख आणखी कुणाच्या वाट्याला येऊ नये म्हणून कळवळताना दिसते. आता उदं-उदं म्हणत, भंडारा उधळत, जोगवा मागत आणि समाजाने केलेले अत्याचार पचवत न जगता या प्रथेचा नायनाट करावा, वाघ्या-भोग्याला उभा चिरावा व हा अन्याय थांबवावा असा विचार या कवितेत आला आहे.

ऊस तोडीची कामे करणाऱ्या माणसांचे दु:ख, त्यांचे दारिद्रय 'आम्ही निघालो गावाला' या कवितेत व्यक्त झालेले आहे. आपल्या गावापासून दूर-दूर ऊसाची तोड करत 'लमाण' जातीची ही माणसं फिरत असतात. त्यांच्याबरोबर त्यांचा सारा संसार असतो. गुरं-ढोरं घेऊन जिथं-जिथं काम असेल तिथं-तिथं खोपी करून राहणाऱ्या या लोकांचे उभे आयुष्य अस्थिर आहे. भटके आहे. या लोकांना दोन वेळच्या भाकरीची भ्रांत आहे. कष्ट करूनही उपासमार आहे. त्यांच्या गुराढोरांना चारा मिळत नाही, बैल उपाशी आहेत. या लोकांना पाण्यासाठी वण-वण करावी लागते. त्यांच्या आयुष्यात केवळ दारिद्रय, उपासमार भटकंतीच आहे. माळरानावर फिरणयातच या उपेक्षितांचे आयुष्य जाते. शहरीकरण,सुधारणा या सर्वांपासून दूर असणारा हा समाजातील एक घटक आहे. आपल्या उपेक्षितपणाची जाणीवही या घटकाला आहे. म्हणूनच आपल्याला जगण्याच शहाणपण कोण शिकवणार ? ही खंत त्यांच्या मनाला आहे.

''आम्ही जातीनं लमाण
उभ्या वणव्याचं जीणं

कोण आम्हा शिकविलं
जगण्याचे शानपण ।।''

('आकाश पेलताना', पृ.१)

समाजातील इतर घटकांच्या जगण्यापेक्षा या लमाण्यांचे जीवन वेगळे आहे. 'उभ्या वणव्याचं जीणं' या ओळीतून कवीने त्यांच्या आयुष्यातील संघर्षाचे, परिस्थितीचे नेमके वर्णन केलेले आहे. सुख, शांतता, विश्रांती या गोष्टी वणव्याच्या जिण्यात कधीच जाणवणार नाहीत. केवळ दैन्य, दारिद्र्यातच या लोकांचे संपूर्ण आयुष्य जाणार आहे. गुरे ढोरे, संसार पोरे ट्रकमध्ये कोंबून पुन्हा पुढच्या माळावर जाण्याची तयार या लोकांना सतत करावी लागत असते. थंडीवाऱ्यात पालाच्या खोपीत कुडकुडावे लागते. राबून-राबून सर्व कातडी सोलून निघते. उघड्या संसारात 'माय' उपाशीच झोपते. उजाड रानात हिंडून पाणी शोधणारी ही माणसे अतिशय बिकट जीवन जगतात. अशाप्रकारे समाजातील उपेक्षिताचे जीवन जगणाऱ्या वेगळ्या घटकाचे वर्णन कवीने घडविले आहे.

'कडकलक्ष्मी-मरीआयचा' गाडा डोक्यावर घेऊन गावोगावी भटकणाऱ्या उपेक्षितांचे दु:ख, दैन्य, 'टाक डुई-डुई' (कडकलक्ष्मी) या कवितेत व्यक्त झाले आहे.

''आली युग गेली युग
भोग अजून संपत न्हायी
थरथरत्या हातापायानं
मेल्यालं सपान पुरायचं हायी ।
टाक डुईऽ डुईऽ टाक डुईऽ डुईऽ
आमचं भयाण जगणं हायी ।''

('आयुष्याच्या वाटेवर', पृ.२०)

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

खरोखरच या लोकांचं जगणं भयाणच आहे । दुखणे-खुपणे, कपड्यांची टंचाई, पिढ्यानंपिढ्यांची उपासमारी, दारिद्र्य या लोकांच्या पाचवीलाच पुजले आहे. आजी-आजापासून उपासमारीचा हा वसा चालत आलेला आहे. मरीआयचा गाडा, कुंकवाचा मळवट कमरेला ढोलक बांधून, कैकरंगाच्या चार चिंध्यांनी अब्रू झाकणारी, भीक मागणारी ही माणसं लांबलचक चाबकाने फटके मारून घेऊन दररोज रक्त काढतात. वण-वण भटकतच सारे आयुष्य जाते. ना घरदार, ना पोट भरून भाकरी, अस्वच्छता आणि घाणीचेचं साम्राज्य. गिधाड सुद्धा फिरकणार नाही अशी अवस्था !

अशा तळागाळातल्या लोकांची आंतरिक वेदना कवीने काव्यबद्ध केलेली आहे. सुखी आयुष्याचं स्वप्न या माणसांना आपल्याच थरथरत्या हाताने पुरावे लागते. दिवस लोटतात, युगे बदलतात, पिढ्या बदलतात परंतु उपेक्षितांचे दु:ख मात्र संपलेले नाही. त्याचे स्वरूप आजही तेच आहे. बदल फक्त या गोष्टीचा आहे की आपल्या जगण्याच्या 'भयाणपणाची' जाणीव मात्र या पिडलेल्या, दु:खी लोकांना झालेली आहे.

'भिकारी' हा असाच समाजातील एक उपेक्षित घटक. आयुष्यभर भीक मागून शेवटी नगरपालिकेच्या गाडीतून ज्याला स्मशानात पोहचविले जाते, ज्याच्या मरणाचे कुणालाही सुख-दु:ख नसते असा दुर्लक्षित माणूस, देवाच्या दारात, शहरात गल्लीबोळातून भीक मागणारा भिकारी कधी अपंग असल्यामुळे असाह्य बनतो. तर कधी म्हातारपणामुळे हतबल बनतो. लोक त्याच्याबद्दल सहानुभूती बाळगतातच असे नाही. पैसे मागताना भिकारी लोकांना आशीर्वाद देतो मात्र लोक भिकाऱ्याच्या तोंडावर शिव्या फेकून निघून जातात. भिकाऱ्याचे हे दु:ख 'देवाच्या दारात' ('आयुष्याच्या वाटेवर', पृ. २८) 'पटांगणात !' ('आयुष्याच्या वाटेवर', पृ. २९) आणि 'भीक' ('आयुष्याच्या वाटेवर', पृ.३१) या कवितेतून व्यक्त झाले आहे.

घाण आणि दारिद्रयाने वखवखलेल्या वस्त्यात रहाणाऱ्या माणसांचे चित्रण 'आमचं काय बी लिवू नका !' या कवितेत आलेले आहे.

"आरं, ह्या आमच्या वखवखलेल्या वस्त्या
कोंबड्याच्या खुराड्यातलं आमचं जीणं
कोंबड्याच्या पालात बाळंत होणाऱ्या
आम्ही आजागळ बायका "

('जगणे माझे', पृ.३३)

असं जीवन जगणाऱ्या स्त्री-पुरूषांच्या आयुष्यावर लिहिणारे बंगले बांधून राहू लागले. मात्र या लोकांची अवस्था मात्र अजिबात बदलली नाही. 'कदाचित' ('जगणे माझे', पृ.३१) या कवितेतही उपेक्षित स्त्रीचे दु:ख आले आहे. जन्मताच सर्वांनी नाकडोळे मोडलेले अशी उपेक्षित मुलगी रोज एक घर फिरते आहे. तरीही पोटाची झोळी रिकामीच आहे. ती लहान आहे तोपर्यंत ठीक आहे. पण... ती मोठी झाल्यावर तिचे काय होणार ? लग्न ? आत्महत्या ? बलात्कार की देहविक्री ? तिला रखेली म्हणून तर जगावे लागणार नाही ना ? हीच खंत या कवितेतून दिसून येते.

'एखादी चादर तरी द्या !' ही ज्ञानेश्वर कोळींची मन सुन्न करणारी कविता ! शहरातून बाहेर घाणीत टाकलेली ही माणसं फाटकी आणि वटकी आहेत. त्यांचे उभे आयुष्यच वटलेले आहे. ही लोकं घाणीतली कामं करतात. बंगल्यात राहणाऱ्या प्रतिष्ठित म्हणून मिरवणाऱ्या लोकांना सुखच सुख मिळते. मात्र या लोकांच्या वाट्याला केवळ छळ आणि दारिद्रय !

"विस्फारलेल्या तप्त किरणात
जिवंत असलेली...! पान झडलेली...!
आदिवासी, भटकी, अस्पृश्य
जातीची वटकी माणसं

आक्रमक, हताश, अनामिक !''

('जगणे माझे', पृ.३७)

ही माणसे प्रसंगी चिडतात, आक्रमक बनतात. मात्र त्यांची स्थिती सुधारू शकलीच नाही.

शेतकरी व शेतमजुरांचे दु:ख ज्ञानेश्वर कोळींनी अनेक कवितेतून मांडलेले आहे. या शेतकऱ्यांना अल्प का होईना जमिनी आहेत. परंतु नापीक, भांडवलाचा अभाव, पाण्याचा तुटवडा, नैसर्गिक संकटे इ. मुळे या जमिनी उपयुक्त ठरत नाहीत. अशा या शेतमजूर, कष्टकरी, शेतकरी कामगारांचा एक महत्त्वपूर्ण स्तर समाजात राब-राब राबत असतो. भुकेचा प्रश्न या शेतकऱ्याच्या आयुष्याला व्यापून उरलेला आहे.

''माझ्या 'बा'च्या नशिबी
पिढीजात कष्ट आलं
उपातापाशी मरून
झडुनिया मांस गेलं ''

('आयुष्याच्या वाटेवर', पृ.३९)

किंवा

''नाही मायीला धडुतं बाप ढाळीतो आसवे
झिजझिजवी धनीन शेजाऱ्यांचे उंबरठे
कष्ट किती करायाचे मोल त्याचे संपले
काळ्या माझ्या धरतीचे रूप कसे लोपले ॥''

('घन दाटलेले', पृ.७)

अशी चिंता हा शेतकरी वर्ग करतो आहे. नैसर्गिक संकटामुळे शेतात पीक येत नाही आणि मग शेतकऱ्यांच्या घरात कसे वातावरण असते हेच वर्णन 'आसमंत फुलवा रे !' (घन दाटलेले, पृ.१३), 'चूल आणि पाऊस' ('घन दाटलेले', पृ.१९),

'कधी येणार पाऊस' ('आकाश पेलताना', पृ.२६), 'महापूर' ('आयुष्याच्या वाटेवर', पृ.१४), 'पाऊस' ('जगणे माझे', पृ.१०) या सर्व कवितेतून आलेले आहे.

आज सर्वत्र आधुनिकीकरण झाले. खेडी सुधारली. वीजेची सोय घराघरात झाली. शेतीत नवे तंत्रज्ञान वापरले जावू लागले. जंगले ओस पडली. शहरे वाढू लागली. आुधनिकीकरणासाठीं जमिनींची खरेदी होऊ लागली. अशा यंत्रयुगात सुधारणेचा केवळ आभास होत आहे. कामगार, शेतमजूरावर वेगळेच संकट येऊ लागले. यावर कवीला 'लालक्रांती' हा एकच पर्याय वाटतो. शेतकरी आज भिकाऱ्याच्या अवस्थेत जीवन जगत आहे. त्याच्यावर भांडवलदारांकडून, अधिकाऱ्यांकडून अन्याय होतो आहे. परंतु आता या शेतकऱ्याने जागे व्हावे, रस्त्यावर यावे आपले शस्त्र उगारून अन्याय थांबवण्यास सज्ज व्हावे असे कवीला वाटते. 'आला बळी रस्त्यावर' ही कविता या अनुषंगाने महत्त्वपूर्ण आहे.

> ''शेतकरी माझा आज
> दोस्त भिकाऱ्याचा झाला ।।
> संगणक जंगलाचे
> थरारले आदिवासी
> जगण्याचे तंत्रज्ञान
> काम करी उपवाशी
> अर्ध्या पोटानं राहुनी आम्ही दिवस काढला''।।१ ।।
>
> ('घन दाटलेले', पृ. ६)

ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेत समाजातले असे विविध स्तर विविध घटक चित्रित झालेले आहेत. त्यांच्या कवितेत आलेल्या विविध स्तरांच्या चित्रणाबद्दल डॉ. शिवाजी पाटील, प्रपाठक, मराठी विभाग, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा हे लिहितात,

"कोळींच्या कवितेत येणारा जनसमूह अस्थिर आहे पण भटका नाही, अस्पृश्य मानलेला नाही. परंतु उपेक्षित आहे. गाव आहे पण गावचा नाही, असा शोषित, नाडलेला पिडलेला, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक उपेक्षाभंगाचे दु:ख पचविणारा विस्कळीत स्वरूपात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात हा समूह विस्तारलेला आहे. 'भाकरीची शाश्वती' हा त्यांच्या जगण्याचा मुख्य केंद्रबिंदू आहे. याच केंद्राच्या परिघात त्यांचे जगणे-वाढणे-फिरणे-थांबणे अविरतपणे सुरू आहे."[५]

अशा कष्टकरी, कामगार वर्गाचे चित्रण कोळींच्या कवितेत प्रकर्षाने आले आहे. समाजातील वेगवेगळ्या स्तरातील घटकांचे जगणे, त्यांच्या वृत्ती-प्रवृत्तीचा वेध कोळींनी आपल्या कवितेत घेतलेलाआहे. ज्यांच्याकडे कुणीही आस्थेने पहात नाही अशा उपेक्षितांचे जग त्यांनी रंगविले आहे. हे वर्णन कोरडे नाही तर सहानुभूतीचा ओलावा लाभल्याने अधिक जिंवत व हृदयस्पर्शी बनलेले आहे. वंचित लोकांच्या जीवनातील अत्यंत सूक्ष्म बारकावेही कवीने टिपलेले आहेत.

## ९) ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतील वास्तव :

कवितेतील 'वास्तव' म्हणजे काय ? या विषयी मीमांसा करताना त्र्यं.वि. सरदेशमुख लिहितात,

"विविध कलांच्या महान आविष्कृतीत सर्व जीवन व्यापाराची वास्तवता समजून घेण्याचा व देण्याचा खटाटोप प्रकट होत असतो. या जीवन व्यापाराने कलावंतावर संस्कार केलेले असतात. त्या व्यापाराचा काही अंश त्याने साक्षात अनुभवलेला असतो. उरलेल्याचा काही अंश त्याने कल्पिलेला असतो. त्याच्यावरील संस्कार व त्याचा अपरोक्ष अनुभव यांच्या पोटी त्यांच्या कल्पनेचा विकास होतो."[६]

अशाच जीवन व्यापाराच्या संस्कारातून जन्मलेली कोळींची कविता वास्तवपूर्ण असून अवतीभोवतीच्या वातावरणाचे आणि व्यवहाराचे संपूर्ण कालभान

राखणारी आहे. आधुनिक मराठी कवितेतील वास्तवाचे आकलन करताना प्रा. रा.ग. जाधव लिहितात,

"कवी समाजशास्त्रज्ञ नसतात व तत्त्वज्ञानीही नसतात हे खरेच आहे. पण काव्यात कळत नकळत वास्तवासंबंधीची विधाने व्यक्त हातात. कधी प्रकटपणे, तर कधी प्रच्छन्नपणे अशी विधाने केली जातात."[७]

ज्ञानेश्वर कोळींचे मन भोवतालच्या वातावरणात रमते. आजुबाजूचे जग, त्यातील घटना-प्रसंग कवीच्या संवेदनशील मनाला भिडतात व त्याचेच चित्रण त्यांच्या कवितेतून अवतरते. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक, कौटुंबिक सर्वच क्षेत्रातील जळजळीत वास्तवता त्यांच्या कवितेत आढळते.

ऊसतोड करणारा कामगार, वीट भट्टीत कामे करणारा कामगार, शेतातील कामे करणारा शेतमजूर, सालाच्या बोलीने कामे करणारा सालगडी, भूकेचा प्रश्न सोडवण्यासाठी समाजातील वेगवेगळ्या स्तरामध्ये जगणारी माणसे, त्यांच्या भोवती असणारा निसर्ग, वातावरण, दारिद्रयात जगणाऱ्या या माणसांच्या वेदना, दुःख, अडचणी या सर्वांचे वास्तव चित्रण कोळींच्या कवितेत उमटले आहे. दुष्काळ, महापूर यासारख्या नैसर्गिक संकटामुळे निर्माण होणारी परिस्थिती, हतबल होणारा माणूस, झाडे, जनावरे,पक्षी यांची होणारी केविलवाणी अवस्था या सर्वांचे वास्तव वर्णन करणाऱ्या 'कोळींच्या' कविता तो प्रसंग प्रत्यक्षपणे डोळ्यासमोर उभा करतात. उदाहरण म्हणून 'कधी येणार पाऊस' या कवितेतील ओळी पाहू.

"दाटे आभाळ शिवारी
गाय हंबरे गोठ्यात
चिवचिव पाखरांची
चारा नाही घरट्यात"

('कधी येणार पाऊस', आकाश पेलताना, पृ. २६)

दिवाळीसारख्या सणाच्या वेळी समाजात असणाऱ्या आनंदाबरोबरच गोरगरिबांच्या व्यथा 'दिवाळी' (जगणे माझे, पृ. २३) कवितेत व्यक्त झाल्या आहेत. 'माणसं राखून असल्यालं बरं असतं !' (जगणे माझे, पृ.२९) व 'आमचं काय बी लिवू नका' (जगणे माझे, पृ.३३) या कविता सामाजिक वास्तव रेखाटणाऱ्या आहेत. 'टाक डुई-डुई' कवितेतील उपेक्षितांच्या जीवनातले वास्तव वाचकाला अस्वस्थ करणारे आहे.

> ''कैक रंगाच्या चार चिंध्यानं
> अवघड जागा झाकल्याली हाय !
> तिरपटणारं दबक् ढोलकं
> भीकंला साद घालीत हाय
> लांबलचक एक चाबूक
> रोज रगात काढीत हायी !
> टाक डुईऽ डुईऽ हाय डुईऽ डुईऽ
> आमचं भयाण जगणं हायी !''

कडकलक्ष्मीचा गाडा घेऊन फिरणाऱ्या लोकांच्या जीवनाचे हे भयाण वास्तव त्यांच्या जगण्यातील दाहकता मांडते.

'पटांगणात' (आयुष्याच्या वाटेवर, पृ.२९), 'माझा बा' (आयुष्याच्या वाटेवर, पृ.३९), 'आम्ही निघालो गावाला' (आकाश पेलताना, पृ.१), 'माझ्या महान देशात' (आकाश पेलताना, पृ.७), 'दिवसभर' (आकाश पेलताना, पृ.४५), 'पीक उभे वाळले' (घन दाटलेले, पृ.७), 'डिचकी' (घन दाटलेले, पृ.३०) अशा अनेक कविता वास्तव चित्रण करणाऱ्या आहेत.

ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतील वास्तवाबद्दल तुकाराम पाटील लिहितात,

"ज्ञानेश्वर कोळी यांचे कविमन सभोवताली रममाण होते. आणि मग शब्दांच्या शोधात निघते. नेमकेपणोन व्यथा वेदना मांडण्यात यशस्वी होते. मग ती माणसे असोत, जनावरे असोत किंवा झाडेझुडपे असोत, त्याचे वास्तव चित्र कवी सहजतेने रेखाटतो."[८]

'कोळींच्या' बहुसंख्य कविताना त्यांच्या जगण्यातून विषय मिळाले आहेत. स्वत:च्या आयुष्याला भेडसावणारे प्रश्न, भोगावी लागणारी दु:खे , सोसावी लागणारी अवहेलना, भुकेचा न मिटणारा प्रश्न या वास्तवाचा आधार त्यांच्या कवितेत आहे. 'घन दाटलेले' कवितासंग्रहाच्या प्रस्तावनेत ते लिहितात,

"भूक आणि गरिबीच्या खेळात पुन्हा शाळा सोडावी लागली आणि दोन वेळच्या जेवणासाठी नांदोरे येथे गुराख्याचे काम करू लागलो. दरम्यानच्या काळात अनेकांचे पाय धरले. अनेक अधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्या. ही सगळी माणसे जवळून पाहिली. त्यांचा अभ्यास केला. त्यांचे आचार पाहिले, विचार पाहिले. ही माणसं वरून स्वच्छ दिसतात पण आतून खूपच घाण असतात. यामुळे अस्वस्थ वाटायचे, मन पेटून उठायचे, डोक्यात विचारांचे काहूर माजायचे आणि याच रसायनातून शब्दांच्या रांगा पोटातून ओठात येऊ लागल्या."[९]

हेच भोगलेले, सोसलेले दारिद्र्य त्यांच्या अनेक कवितेत डोकावते. 'कविते' (जगणे माझे, पृ.१), 'भाऊबीज', (जगणे माझे, पृ.१८), 'पीक उभे वाळले' (घन दाटलेलं, पृ.७), 'घरकुल' (घन दाटलेले, पृ.८), 'डिचकी' (घन दाटलेले, पृ.३०), 'सलाईन' (घन दाटलेले,पृ.४६), 'मातेरं' (आकाश पेलताना, पृ.४९), 'माझा बा' (आयुष्याच्या वाटेवर, पृ.७) या सर्व कवितेतून कवीने भोगलेल्या दारिद्रयाचे पडसाद उमटतात.

समाजातील अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार, फसवणूक, वाढता चंगळवाद याचेही वास्तव चित्रण कोळींच्या कवितेत आलेले आहे. त्यादृष्टीने 'माणूस' (जगणे माझे, पृ.२), 'माणसा' (जगणे माझे, पृ.३), 'पुढं काय करायचं त्ये बघू या !' (जगणे माझे, पृ.१९), 'माणस राखून असल्यालं बरं असतं !' (जगणे माझं, पृ. २९), 'संस्कृती' (आयुष्याच्या वाटेवर, पृ. ३०), 'देश आपला नवा घडवू' (आकाश पेलताना,पृ.३०), 'आसं कसं झालं', (आकाश पेलताना, पृ.३१) या कविता महत्त्वपूर्ण आहेत. समाजातील वास्तवतेतूनच कवीला कविता स्फुरते.

"माझ्या डोक्यात नाचतात
इथल्या वास्तवतेची भुतं आणि
मनाच्या तळाशी दबून राहिलेल्या कविता
तशा दबूनच राहतात
धरणाच्या खोल तळाशी
धुमसतात भूकंपासारख्या !"

('चिरलेले दरवाजे', घन दाटलेले, पृ.३१)

आणि या धुमसणाऱ्या भावेनतूनच कवीच्या वास्तवपूर्ण कवितांचा जन्म होतो. ज्ञानेश्वर कोळींच्या अशा अनेक कवितातून समाजातील वास्तव मांडलेले आहे. कवी केवळ वास्तव मांडून थांबत नाहीत तर त्या पुढे जाऊन सामाजिक अभ्युदयाचा विचार मांडताना दिसतात. असणारे भयाण वास्तव बदलण्याची इच्छाशक्ती त्यांच्या कवितेत दिसते व परिस्थिती बदलण्याचा अदम्य आशावादही प्रकट होतो.

## १०) ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतून अभिव्यक्त झालेले बदल परिवर्तनाचे चित्र :

समाजातील प्रत्येक क्षेत्रात झालेला बदल, बदललेली जगण्याची शैली, बदलती जीवनमूल्ये, भावभावना या सर्वांचे चित्रण कोळींच्या कवितेतून उमटलेले

आहे. या बदलाचे झालले इष्ट-अनिष्ट परिणामही कवीने मार्मिकपणे टिपलेले आहेत. माणूस आज भौतिक सुखाच्या मागे लागला आहे. त्यामुळे तो माणुसकी विसरून केवळ पैशाचा विचार करतो आहे. हा मानवी स्वभावातील घातक बदल कोळींनी अनेक कवितातून व्यक्त केलेला आहे. 'माणूस' (जगणे माझे, पृ.२), 'माणसा' (जगणे माझे, पृ.३), 'आणि... मग...' (जगणे माझे, पृ.७), 'मानवता' (जगणे माझे, पृ.११), 'मानवा' (जगणे माझे, पृ.२), 'माझ्या महान देशात' (आकाश पेलताना, पृ.७), 'चला चला रे' (आकाश पेलताना, पृ.५), 'मातेरं सुद्धा महाग आहे' (घन दाटलेले, पृ.१४), 'गजबजलेलं गाव' (घन दाटलेले, पृ.२८) या कवितातून बदलते मानवी जीवन व समाज जीवन यांचे चित्रण कवी करतो. हा बदल अनिष्ट बदल आहे. घातक आहे. परंतु ते समाजातील वास्तव आहे.

समाजातील वैज्ञानिक प्रगती, त्या प्रगतीचे परिणाम, वाढते यांत्रिकीकरण व त्याचबरोबर माणसाच्या आयुष्याला आलेले यांत्रिकपण कोळींच्या अनेक कवितेत दिसून येते. संगणकीकरणाचा वापर समाजाच्या दृष्टीने फायद्याचा आहे. पण त्याचे काही दुष्परिणाम सामान्यांना भोगावे लागत आहेत. ही खंतही त्यांच्या कवितेतून दिसते.

> ''विज्ञानाचा घोडा आता सुसाट वेगात सुटला रे
> वास्तवाचे शिंग वाजले चला चला रे पुढे ''
>
> ('चला चला रे', आकाश पेलताना, पृ.५)

असा इशारा ते देतात व विज्ञानाबरोबरच येणाऱ्या स्पर्धेची जाणीवही करून देतात. विज्ञान युगात माणसांची दैना कशी होते ते 'माझ्या महान देशात' (आकाश पेलताना, पृ.७) या कवितेत व्यक्त केले आहे.

वाढत्या यांत्रिकीकरणाबरोबर माणसाचे सगळे जीवनच यंत्रवत झालेले आहे. घन मिळवणे, स्वत:पुरता विचार करणे, सुखासाठी आटापिटा करणे एवढेच या माणसांना कळते. परंतु सुखासाठी पैशामागे धावणारा हा समाज सुखी मात्र नाही.

"धुक्याची पहाट
विज्ञानयुगात
तंत्राचा आघात
दारोदारी"     ('रागावरी रांगा', घन दाटले, पृ.३)

मुंग्यांच्या रांगा जाव्यात तशी ही माणसे मुकपणे आपल्या रस्त्यांनी जाताना दिसतात. आपल्या घरात ही माणसे रडत-कुढत जगतात. सकाळ झाली की पुन्हा माणसांच्या गर्दीत मिसळतात. दिवसभराचे तेच-ते जगणे सुरू होते. एकूणच या माणसांच्या जगण्यालाही आता यांत्रिकपण आलेले आहे. समाजातील नम्रता, सहनशीलता, समता, बंधुता, चारित्र्य यांची कमतरता भासू लागली आहे. सगळीकडे स्वार्थ, भ्रष्टाचार, अन्याय, लाचारी, वेदना यांना मात्र ऊत आला आहे. हे पाहून कवी चिंताग्रस्त होतो व हे वास्तव बदलले पाहिजे असा विचार त्यांच्या मनात येतो याचेच वर्णन 'बाजारात' या कवितेत आले आहे.

"विज्ञान घेणार का तंत्रज्ञान घेणार ?"
कोपऱ्यातल्या रोबोचा आवाज ऐकून
अवाकच झालो तसाच निघालो घराकडे"

('बाजारात', घन दाटलेले, पृ.३४)

'हुतात्मा आणि महात्मा' (आकाश पेलताना, पृ.४०) या कवितेत कवीने बदलत्या जीवनशैलीचे आणि आदर्शाच्या पायमल्लीचे चित्रण केलेले आहे. मातीच्या घराऐवजी माणसे आज बंगल्यात राहू लागली. ती 'स्टँडर्ड', घरंदाज बनू लागली. ही माणसे लाचारासमोर प्रतिष्ठित होतात आणि प्रतिष्ठितासमोर लाचार बनतात.

दुसऱ्यांच्या पैशावर या माणसांचा डोळा असतो. ही माणसे स्वाभिमान गमावून बसलेली आहेत. समाजातील उदात्त आणि उत्तम या लोकांनी नष्ट केले आहे. अशा माणसांच्या कळपात अणुबॉम्ब, काडतूसं नाही टाकता आले तरी एखादा 'इंगूळ'तरी टाकावा असे कविता वाटते. हीच बदललेली जीवनशैली 'संघटना' (आकाश पेलताना, पृ.५०) या कवितेतूनही चित्रित झाली आहे. आपण ज्यांना मान देतो, ज्यांच्यासमोर नम्र होतो ते प्रतिष्ठित लोक प्रत्यक्षात मात्र मोठे नाहीतच. ही माणसे रोज आपले रूप बदलतात. आळीपाळीने एकमेकांना मान देतात.

समाजातील या माणसांच्या आचरणातील बदल कवीने अचूकपणे टिपलेला आहे. या बदलामुळे संपत चाललेल्या माणुसकीचे, नष्ट होणाऱ्या संवेदनशीलतेचे चित्रण ही कवी रंगवितात. आहे हे केवळ स्वीकारून, मांडून त्यांची कविता थांबत नाही तर हे वास्तव बदलून अपेक्षित समाजाचे चित्र यावे म्हणून क्रांतीची भाषा करणारी ही कविता अधिकाधिक सजग झालेली दिसते.

## ११) ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेतील सजगता – जागृतीचे भान :

जीवन जगत असताना क्षणोक्षणी होणारी घुसमट, वेदनेचे जग, भूक, दारिद्र्य, उपासमार, वाढता भोगवाद, चंगळवाद, भ्रष्टाचार, नैतिक मूल्यांचा ऱ्हास इ. सर्व बाबींचे वास्तवपूर्ण वर्णन कोळींच्या कवितेत उमटले आहे. या सर्व गोष्टींनी कवीचे संवेदनशील मन अधिकच अंतर्मुख होते व समाजातील वास्तव बदलण्यासाठी विचार करू लागते. त्यातूनच त्यांच्या कवितेमध्ये जागृतीचे भान उमटलेले दिसते. कोळींच्या कवितेतील माणूस हा उपेक्षित आहे. अन्याय सहन करणारा आहे. परिस्थितीशी, निसर्गाशी, मानवनिर्मित संकटाशी तोंड देत जगणारा आहे. या माणसात आता परिस्थितीचे भान निर्माण झाले आहे. सजग झालेला हा समाज आता क्रांतीची भाषा बोलू लागला आहे. याचेच पडसाद त्यांच्या अनेक कवितेत उमटलेले आहेत.

पुढारी, अधिकारी, सावकर, मालक हे सर्व लोक आपल्यावर अन्याय करतात, आपले कोणतेही काम न करता केवळ आपल्याला खेळवत ठेवतात, आपला वापर केवळ स्वार्थासाठी करतात याची जाणीव आज सामान्य माणसात होऊ लागली आहे. या सर्व अन्याय करणाऱ्या लोकांना आता धडा शिकवला पाहिजे. हा विचार 'पुढं काय करायचं त्ये बघू या !' (जगणे माझे, पृ.१९) या कवितेतून व्यक्त झालेला आहे. 'आमचं कायबी लिवू नका !' (जगणे माझे, पृ.३३) या कवितेतील उपेक्षित समाज आता जागृत झाला आहे. आपले दु:ख मांडणारे पैसा कमवून सुखी होत आहेत. मात्र आपल्या दु:खात घट होत नाही. या लेखक व कवीना आपल्याविषयी आत्मियता नाही केवळ फायद्यासाठी ते आपल्यावर लिखाण करतात म्हणूनच हा उपेक्षित जागृत झाला आहे व आपली दु:खे आपणच लिहू अशी ग्वाही देतो आहे.

ऐक पोरी सांगते तुला (आयुष्याच्या वाटेवर, पृ.३२) ही एक जागृतीचे भान प्रकट करणारी कविता आहे. 'मुरळी' ही समाजातील एक अनिष्ट प्रथा. मुरळी म्हणून जगणारी स्त्री ही उपेक्षित असते. समाजाचा अन्याय सहन करत ती मुकाटपणे आयुष्य जगत असते. प्रस्तुत कवितेत मात्र या स्त्रीमध्ये जागृती निर्माण केली आहे. मुरळी म्हणून न जगता तिनेही लग्न करावे, तिचीही कुस उजवावी, तिनेही स्वाभिमानाने जगावे, अन्याय करणाऱ्या वाघ्याला तिने नष्ट करावे अशी अपेक्षा या कवितेत केलेली आहे.

'आला बळी रस्त्यावर' (घन दाटलेले, पृ.६) या कवितेतून जागृत झालेल्या शेतकरी वर्गाचे चित्रण आलेले आहे. शेतकरी दारिद्रयात जीवन जगतो आहे. त्याची अवस्था भिकाऱ्यासारखी झालेली आहे. अधिकारी वर्ग आणि सरकारी कर्मचारी यांच्याकडून तो नाडला जाऊ लागला, पण आता त्याच शेतकऱ्यात, कामगारात जागृतीचे भान निर्माण झाले. आपली हत्यारे परजून तो रस्त्यावर संघर्षासाठी उतरला

आहे. आपल्या खताची किंमत देऊन क्रांतीसाठी सज्ज झाला आहे. आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव आता त्याला झाली आणि तो पेटून उठला.

"पलटणी आल्या आल्या
आणि घरात घुसल्या
नको नको म्हणताना
तारा विजेच्या जोडल्या
जाग आली माणसाला आणि पेटून उठला "

('आला बळी रस्त्यावर', घन दाटलेले, पृ.६)

दारिद्र्यात जगणाऱ्या सामान्य माणसातही आता आपल्या परिस्थितीचे भान निर्माण झाले आहे. शिक्षण घेऊन आहे ही परिस्थिती बदलावी, दारिद्र्य नष्ट करावे, आपली प्रगती व्हावी ही भावना निर्माण झाली आहे. 'आकाशात झेप' (आकाश पेलताना, पृ.३२) ही कविता या दृष्टीने महत्त्वाची आहे. स्वत: दारिद्र्यात जगणारी आई आपल्या मुला-बाळांना शेतात सहज मिळणारी भाजी मोठ्या अपूर्वाईने करून घालते. 'अडाणी रहायचे नाही' असे आवर्जून सांगते. मुलांची प्रगती पाहून तिचे मन आनंदून जाते.

जीवनात सुख-समाधान न मिळणारी माणसं आपल्या आयुष्याबाबत नाराज असतात. त्यांच्या आयुष्यात आनंदाचा प्रकाश पसरत नाही. त्यांच्या सुखाची पौर्णिमा कधी उगवतच नाही. अशा माणसांना आत्महत्या करावीशी वाटते. अशा दुबळ्या माणसांना कवी जागृत करतो 'आणि....मग...' (जगणे माझे, पृ.७) ही कविता अशीच आत्मभान निर्माण करणारी आहे. स्वत:च स्वत:च्या सुखाचा मार्ग शोधला पाहिजे, आपणास दु:खी करणाऱ्या नराधमांना नष्ट केलं पाहिजे. हा संदेश कवी या कवितेतून देतात.

समाजात आज माणुसकी उरलेली नाही. सगळीकडे स्वार्थाचा बाजार भरला आहे. सत्य–अहिंसा या मूल्यांना काहीही किंमत उरलेली नाही. अशावेळी कवी युवकांमध्ये सजगता निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. 'मानवा' (जगणे माझे, पृ.२७) या कवितेतून कवी समाजातील विघातक गोष्टी नष्ट करण्यासाठी युवकांना जागृत करण्याचा प्रयत्न करतात.

"दिवे उजळू या घराघरातून
नव्या युगाचे बांधू तोरण
सत्य अहिंसेने रचलेली स्वप्ने करूया साकार"

('मानवा, जगणे माझे, पृ.२७)

एकूणच ज्ञानेश्वर कोळींची कविता समाजात नवजागृती करणारी, सजगता आणणारी कविता आहे. समाजातील विघातक असणारे वास्तव बदलण्याची उमेद या कवितेत आहे. अन्याय सहन करत जगणाऱ्या माणसामध्ये स्वाभिमान जागृत करून संघर्षाला सिद्ध करणारी ही कविता आत्मबळ वाढवणारी आहे.

## १२) ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेचे अभिव्यक्ती विशेष :

- ज्ञानेश्वर कोळींनी ग्रामीण भागातील उपेक्षितांच्या व्यथा वेदना मांडण्यासाठी खास ग्रामीण शब्दांचा, म्हणींचा, वाकप्रचारांचा प्रभावी वापर केलेला आढळतो.

- ज्ञानेश्वर कोळींच्या काव्यात अभिव्यक्तीच्या दृष्टीने विविधता आहे मुक्तछंद, अभंग, ओवी, गझल अशा रचनाप्रकारातून कवीने काव्य अभिव्यक्ती केलेली आहे.

- ज्ञानेश्वर कोळींची कविता म्हणजे त्यांचा अनुभवसमृद्ध अविष्कार आहे. कवीने अवतीभोवती जे जग पाहिजे, जे जीवन त्यांच्या वाट्याला आले त्याचाच पडसाद त्यांच्या या कवितेतून उमटला आहे.
- ज्ञानेश्वर कोळींच्या कवितेत प्रतिमांची विपुलता जाणवते. निसर्गातील अनेक प्रतिमांचा व प्रतीकांचा सूचकतेने वापर केलेला आढळतो.
- कोळींच्या कवितेला नादमयता, लयबद्धता प्राप्त झाल्याने गेयतेचे लेणे या कवितांना लाभलेले आहे.
- कवितेतील शब्दकळा ही वास्तवपूर्ण असल्याने कवितेत कुठेही कृत्रिमता निर्माण होत नाही. सहज, सोपी रचना मनाला भिडते हे या कवितेच्या अभिव्यक्तीचे वैशिष्ट्य आहे.
- अनेक अलंकारांचा योग्य वापर केल्याने कवितेची भाषा सौंदर्यपूर्ण बनलेली आढळते.
- कोळींच्या कवितेतून मानवी जीवनाच्या विविध स्तरांचे व घटकांचे प्रभावी चित्रण झालेले आहे.
- कवीने प्रखर वास्तव तर कवितेतून मांडलेले आहेच, पण हे वास्तव बदलण्यासाठीची सजगताही कवीच्या ठिकाणी आहे.

----

## प्रकरण तिसरे

## संदर्भ सूची


१. रसाळ, सुधीर : 'कविता आणि प्रतिमा', मौज प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती, २००२, पृ. १८८.

२. पाटील, गंगाधर : 'समीक्षेची नवी रूपे', मॅजेस्टिक प्रकाशन, दुसरी आवृत्ती, जुलै, २००१, पृ.१५.

३. करंदीकर, गो.वि. : 'परंपरा आणि नवता', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती, पृ. १०९.

४. रसाळ, सुधीर : 'कविता आणि प्रतिमा', मौज प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, १९८२, पृ.२००.

५. पाटील, शिवाजी : 'साक्षात', त्रैमासिक, जानेवारी, २००७, पृ.५-९.

६. सरदेशमुख, त्र्यं.वि. : 'निवडक मराठी समीक्षा', संपा. गो.मा. पवार, म.द. हातकणंगलेकर, साहित्य अकादमी, प्रथमावृत्ती, १९९९, पृ. २०३-२०४.

७. जाधव, रा.ग. : 'काव्य समीक्षेतील धुळाक्षरे', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे,प्रथमावृत्ती, १० जानेवारी, २००४, पृ. ९०.

८. पाटील, तुकाराम : प्रस्तावना, 'छावणीच्या कविता', निर्मोही प्रकाशन, पुणे,प्रथमावृत्ती, १ जानेवारी, २००४.

९. कोळी, ज्ञानेश्वर : प्रस्तावना, 'घन दाटलेले', सुयश प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १६ मे, २००२.


----